# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील सहकारनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ०४/१०/२०१७

सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे राजू उर्फ डड्या संजय लोंढे, वय २१ वर्षे, रा. स.नं. ६५ सुवर्ण मंदीरा जवळ, तळजाई वसाहत, पद्मावती पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ४०/२०१७ दिनांक ०४/१०/२०१७ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम जखमी करणे, गंभीर जखमी करणे, शिवीगाळ करुन हाताने मारहाण करणे, बेकायदेशिर जमावाचा सभासद असणे, प्राणघातक हत्यारांसह सज्ज होवून बेकायदेशिर जमावात सामील होणे, दंगा करणे, प्राणघातक शस्त्रानिशी सज्ज होवून दंगा करणे, समान उदिष्ट साधण्यासाठी बेकायदेशिर जमावाचा सभासद होणे, जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती करणे, नुकसान करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, दुखापत किंवा हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण करणे, लैंगीक सतावणुक करणे, अल्पवयीन मुलावर लैंगीक अत्याचार करणे, खून करण्याचा प्रयत्न, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती करुन दुखापत करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द सहकारनगर पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रवीण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.